महाराष्ट्र शासन
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु),
अधिष्ठाता यांचे कार्यालय, डॉ. ॲनीबेझंट रोड,वरळी, मुंबई ४०० ०१८.
०२२ - २४९३४२१४ फॅक्स . . ०२२ - २४९३६८८१
(website :- www.ayurvedinstitute.com, email :- deanrapmc@gmail.com)

जा.क्र. राआपोम/भांडार/जिवायो २४-२५/२०२४ /6464 दिनांक :- 06 SEP 2024

## जाहिरात/Notice for Quotation

प्रति,

....................................

....................................

...................................

विषय:- दरपत्रक **( Quotation )** सादर करणेबाबत.
नियमित साफसफाई साधनसामुग्रीकरीता दरपत्रक सादर करणेबाबत.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ अंतर्गत मंजूर नियतव्ययातून खालील साधनसामुग्री खरेदी करणेकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

आपणांस सूचित करण्यात येते की, महाविद्यालयाकरिता या पत्रासोबत जोडलेल्या साधनसामुग्रीकरीता नमुद केलेल्या निर्दिष्टानुसार साधनसामुग्रीचा पुरवठा करणेसाठी कमीत कमी दराची मोहोरबंद पाकिटातील दरपत्रके दिनांक २०.०९.२०२४ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत पोहचतील अशा बेताने अधिष्ठाता यांचे कार्यालयात खालील नमूद अटी व शर्ती यांच्या अधिन राहून सादर करण्यात यावीत.

### अटी व शर्ती

१. दिनांक २०.०९.२०२४ रोजी सांय ५.०० वाजल्यानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. दरपत्रक सादर करताना अशा प्रकारच्या खरेदीवर शासनाकडून आकारले जाणारे विविध कर (taxes) स्वतंत्रपणे नमूद करावेत.

३. दरपत्रक सादर करतेवेळी साधनसामुग्री पुरवठा करणेसाठी आपले काही शुल्क/दर असल्यास ते देखिल स्वतंत्रपणे नमूद करावेत.

४. दरपत्रक सादर करताना GST क्रमांक नमूद असलेल्या लेटरहेडवर सादर करावे.

५. दरपत्रक सादर करणा-या दरपत्रकधारकाचा किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असू नये, तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधिक दरपत्रके नाकारण्यात येतील. याकरीता सोबत जोडण्यात आलेली हमीपत्र दरपत्रकधारकास सादर करणे बंधनकारक राहील. **(हमी पत्र विहीत नमुन्यात सादर करावे )**

६. दरपत्रक धारकांनी केवळ एकच दरपत्रक सादर करावे. दरपत्रक सादर केलेल्या दरपत्रकधारकाचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्ष/अप्रत्सक्ष संबध वा सहभाग नसावा. आढळल्यास दरपत्रक नाकारण्यात येतील.

७. साधनसामुग्री खरेदी प्रश्चात साधनसामुग्री करीता देण्यात येणारा हमी कालावधी ( Warranty Period) ठळकपणे नमूद करावा.

८. दरपत्रक सादर करतेवेळी मोहोरबंद/सीलबंद पाकिटांवर **"नियमित साफसफाई साधनसामुग्री करीताचे दरपत्रक"** असे स्पष्टपणे नमूद करावे.

९. खरेदी प्रक्रिया, यशस्वी दरपत्रक स्विकारणाच्या पूर्वी किंवा यशस्वी दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर देखिल कोणत्याही वेळी लेखी नमूद करावयाच्या कारणांमुळे रदद करण्याचे अधिकार हे कार्यालय राखून ठेवीत आहे.

१०. विहीत कालावधीत प्राप्त दरपत्रके दिनांक २३.०९.२०२४ रोजी स. ११.०० वा. अधिष्ठाता यांचे दालनात उघडण्यात येतील त्यावेळी कंपनीच्या एका प्रतिनिधीस स्वखर्चाने हजर राहण्याची मुभा राहील.

११. दरपत्रक उघडल्यानंतर आपण सादर केलेल्या साधनसामुग्रीच्या विर्निदिष्टानुसार ( Specification) सदर साधनसामुग्री प्रत्यक्ष पडताळणी व आवश्यकता वाटल्यास चाचणी महाविद्यालयातील संबधित तज्ञामार्फत करण्यात येईल. त्याकरिता आपण आवश्यक ती व्यवस्था करुन ठेवावी.

१२. पुरवठादाराने सदर खरेदी संदर्भातील आवश्यक माहिती यासोबतच्या प्रपत्रात **(Annexure -B)** मध्ये सादर करावी.

१३. खरेदी प्रक्रियेच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार अधिष्ठाता, रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई हे राखून ठेवत आहेत.

( वैद्या संपदा सं. संत, )
अधिष्ठाता
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय(आयु),
वरळी, मुंबई १८.

प्रत,
महाविद्यालयीन सुचना फलक

ANNEXURE -A

## रा. आ. पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई

### अ- नियमित साफ सफाई सामुग्री

| अ.क्र. | सामुग्रीचे नाव | विर्निदिष्टे | मागणी संख्या | पॅकेजिंग | दर | एकुण किंमत (सर्व करासहित) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | हात धुण्याचा साबन १०० ग्रॅम | Hand soap, १०० Gram | 300 | नग | | |
| 2 | भांडी घासण्याचा साबन २०० ग्रॅम | Utensil soap, २०० Gram | 300 | नग | | |
| 3 | फूल झाडू | GMS : ४१५ GMS | 100 | नग | | |
| 4 | खराटा झाडू | GMS : ४८५ GMS | 100 | नग | | |
| 5 | लिक्वीड हॅन्ड वॉश ( १/४ लिटर ) | Foaming Hand wash Pump, Strawberry, Rich Foam, Moisturizing Hand wash,Soft on hands | 200 | नग | | |
| 6 | मास्क | Fabric ३ Ply Disposable face Mask (१०० Pack ) | 50 | पॅकेट | | |
| 7 | हॅन्ड ग्लोज | Rubber Heavy duty hand gloves for Cleaning ( Inner cotton lining for comfort ) | 300 | जोडी | | |
| 8 | टेबल डस्टर क्लोथ | Cotton Table duster Cloth | 100 | नग | | |
| 9 | स्टिक विथ लॉग चिंदी | Cindith length १८ inch, Plate ११ inch, Stick : Wooden/Metal, Stick Size ४.५० ft | 50 | नग | | |
| 10 | रशी विंथ चिंदी | Weight :४५५ GMS, Fully White | 50 | नग | | |
| 11 | १२० लिटर डस्टबिन विथ व्हिल | Capacity : १२० Litter, Opening Mechanism : Manual lift, Material Plastic | 10 | नग | | |
| 12 | २४० लिटर डस्टबिन विथ व्हिल | Capacity : २४० Litter, Opening Mechanism : Manual lift, Material Plastic | 10 | नग | | |

| अ.क्र. | सामुग्रीचे नाव | विर्निदिष्टे | मागणी संख्या | पॅकेजिंग | दर | एकुण किंमत (सर्व करासहित) |
|---|---|---|---|---|---|---|
| 13 | बायोहझार्ड गार्बेज बॅग् | Dimension :२४*२७ inch, Color : Red/Yellow/Blue, Low density Garbage bags with descriptions and the universal biohazard symbol featured to held ensure complete understanding for safety and proper use. Premium virgin plastic quality Medical Waste Garbage Bags are made from linear low density polyethylene LLDPE and have a durable reinforced gusseted bottom seal. Easy to lift and carry, no breakable, durable and environmentally friendly. | 100 | किलो | | |
| 14 | फ्लोर क्लीनर | Odour : Should be suitably perfumed as agreed to between the purchaser and the supplier and if unperfumed, it shall have no disagreeable odour. Ph : Between ०६-०८. Stability : it should remain as homogeneous stable product and shall show no sign of separation or sedimentation when kept at ५°C for २४ h. Specific gravity : about १.०० V/W, Total Fatty matter content : NLT ४%, Matter insoluble in water : NMT ५%, Free Caustic Alkali : NMT ०.०३% | 2000 | Per Liter | | |